नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/09/2020 (बुधवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 9 कि.मी. अंतरावरील मौजा उदासा शिवार एसएच 09 येथे दिनांक 20/08/2020 चे 20:00 वा. चे 20:30 वा. दरम्यान मृतक नामे– दिलीप जिवन वांगे, वय 42 वर्ष, रा. खरबी चौक, नागपुर हे आपले एम. एच– 49/बि.ए.– 1531 क्रमांकाच्या बजाज सिडी 100 मोटरसायकलने चिमुर वरून नागपुर कडे एकटे जात असतांना नागपुर ते उमरेड रोड वरील मौजा उदासा शिवारातील एस एच 09 वरील रोड ठेकेदार आरोपी याने नागपुर उमरेड रोड वरील मौजा उदासा शिवारातील पुलीयाचे खडया जवळील रोड वळनावर वाहतुकीच्या दृष्टीकोणातुन आपले कर्तव्यात निष्काळजीपणा करून रोड वळनावर परीपुर्णफलक व बॅरीकेट न लावता अर्धवट फलक व बॅरीकेट लावले त्यामुळे दिलीप वांगे हे आपले मोटरसायकल सह रोड वळनावरील अर्धवट खुल्या जागेतुन मोटरसायकल सह रोडने सरळ जावुन रोड वरील पुलीयाचे खडयात पडुन गंभीर जखमी होउन मरण पावले. मर्ग क्र. 42/20 कलम 174 जा. फौ. चे चौकशी दरम्यान निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा प्रफुल्ल माहुरे पो.स्टे. उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास परि पोलिस उपनिरीक्षक मिरा मटाले 8394814687 या करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील मंगळवारीपेठ उमरेड येथे दिनांक 22/09/2020 चे 11:00 वा. ते 11.30 वा. दरम्यान मृतक नामे– कमल प्यारेलाल तांबेकर, वय 52 वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड हे पंचायत समीतीचे खाली जागेत मंगळवारीपेठ येथे एकटे बसले असता अज्ञात चार चाकी वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन कमल तांबेकर यांना धडक दिली. या अपघातात कमल तांबेकर हे गंभीर झाल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कार्तिक रवीशंकर महातो, वय 27 वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134(अ)(ब)/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नितेश डोर्लीकर 9595678234 हे करीत आहे.

3) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील एनएच 53 नागपुर ते भंडारा उमरी फाटा येथे दिनांक 22/09/2020 चे 01:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुमीत भोलागिर गिरी वय 33 वर्ष रा. आदर्श कॉलनी बेलेकर ले आउट च्या मागे, वार्ड क 05 ब्राम्हणी ता कळमेश्वर व ड्रायव्हर नामे– संतोशकुमार महेश्वर मुदुली, वय 33 वर्ष, रा. आनलो लिहाली, जि. कटक ओरीसा हे दोघेही वीडी– 02/पी– 8887 क्रमांकाच्या कंटेनरने एनएच 53 रोड ने नागपुर वरुन भुवनेश्वर येथे जात असता त्यांना लधुशंका लागल्याने त्यांनी आपला कंटेनर रोड चे बाजुला थांबवुन रोडचे साईडला गेले. त्यादरम्यान एमएच– 12/एनएक्स–1805 क्रमांकाचा आरोपी कन्टेनरचा चालकाने आपले ताब्यातील कंटेनर बेजबाबदार स्पीडमध्ये चालवुन मागुन सदर कन्टेनर ला धडक दिली. या अपघातात कन्टेनर चा चालक संतोशकुमार मुदुली यांचे अंगावर पलटी झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 337 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. बेला – दिनांक 21/09/2020 चे 16.00 वा. चे सुमारास पो.स्टे. बेला हद्दीत फिर्यादी यांच्या 17 वर्षीय मुलीला आरोपी नामे– अनिकेत नागदेवते, रा. भिसी याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री राहुल ठेंगणे 9823364147 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर